मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## स्मारकासाठी 13 कोटी 52 लाखांचा खर्च : प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे भूषवणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे शुक्रवारी (१८ एप्रिल ) रोजी सकाळी पावणेदहा वाजता



होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याव्यतिरिक्त खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अरूण लाड, उमा खापरे, जयंत आसगावकर, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दिलीप वळसे पाटील, भीमराव तापकीर, विजय शिवतारे, महेश लांडगे, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनिल कांबळे, चेतन तुपे, शरद सोनवणे, सिद्धार्थ शिरोळे, सुनिल शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासणे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके यांची उपस्थिती असणार आहे. तसेच क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

चिंचवड येथे उभारण्यात आलेले हुतात्मा चापेकर स्मारक क्रांतिकारक चापेकर बंधूंच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची आठवण करून देणारे स्थळ आहे. सन १८९७ मध्ये प्लेगच्या नियंत्रणासाठी नेमलेल्या ब्रिटीश अधिकारी वॉल्टर चार्ल्स रँड यांचा वध केल्यामुळे हे बंधू ओळखले जातात. त्यांनी ब्रिटिशांच्या धोरणांचा विरोध केला आणि स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. या स्मारकाच्या माध्यमातून क्रांतीवीर चापेकर बंधूंच्या इतिहासाविषयी माहिती विविध स्वरूपात साकार करण्यात आली आहे. या स्मारकाचे लोकार्पण १८ एप्रिल रोजी संपन्न होणार आहे.

### स्मारकासाठी 13 कोटी 52 लाखांचा खर्च

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकासाठी सुमारे १३ कोटी ५२ लाख रुपये खर्चाची निविदा काढण्यात आली आहे. या स्मारकामध्ये ३०० चौरस मीटर क्षेत्रफळाचा दोन मजली पारंपारिक लाकडी वाडा जतन करण्यात आला असून यात चापेकर बंधूंच्या कौटुंबिक जीवनाचे विविध चित्रण करण्यात आले आहे. आधुनिक एआर, व्हीआर तंत्रज्ञानाचा वापर करून सजीव अनुभव देणाऱ्या घटनांचे चित्रण देखील करण्यात आले आहे.

# कचऱ्यातून निर्माण होणाऱ्या विजेवर महापालिका 'प्रकाश'मान!

## पिंपरी-चिंचवडमधील मोशीत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पात 13 कोटी युनिट वीजनिर्मिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपोमध्ये उभारलेल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्पात दीड वर्षात दोन लाख ५७ हजार ८१९ टन कचरा जाळून १३ कोटी ८२ लाख ४० हजार युनिट वीज निर्माण करण्यात आली आहे. विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड महापालिकेने हा उपक्रम साकारला असून, ही वीज महापालिकेच्या विविध कार्यालयांत वापरली जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज ८०० टन सुका आणि ४०० टन ओला, असा एकूण १२०० टन कचरा संकलित होतो. घंटागाडीच्या माध्यमातून हा कचरा मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये आणला जातो. येथे ८१ एकर जागेवर कचरा डेपो विस्तारला आहे. त्या ठिकाणी कम्पोस्टिंग, गांडूळ खत, प्लास्टिकपासून इंधन निर्मिती असे विविध प्रकल्प कार्यान्वित आहेत. घनकचरा विघटनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प 'बांधा, वापरा



आणि हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर उभारण्यात आला आहे. खासगी संस्थेच्या माध्यमातून २१ वर्षे कालावधीसाठी प्रकल्प चालविला जाणार आहे. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पात एक हजार टन कचऱ्यापासून दररोज १४ मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे.

### महापालिकेच्या वीज देयकात 30 टक्के बचत

» या प्रकल्पामुळे शहरातील वाढत्या कचऱ्याची समस्याही मार्गी लागत आहे. गेल्या दीड वर्षात दोन लाख ५७ हजार ८१९ टन कचरा जाळण्यात आला आहे. या कचऱ्यापासून १३ कोटी ८२ लाख ४० हजार युनिट वीज निर्माण झाली. यामधील १२ कोटी २४ लाख ५० हजार १४७ युनिट वीज महावितरणला देण्यात आली आहे. महावितरणकडून ही वीज प्रति युनिट पाच रुपये दराने महापालिकेस उपलब्ध होत आहे. ही वीज महापालिकेच्या पाणीपुरवठा केंद्र, मैला शुद्धीकरण केंद्र आणि रुग्णालयांमध्ये वापरण्यात येत आहे. यामुळे महापालिकेच्या वीज देयकात ३० टक्के बचत होत असल्याचा दावा प्रशासनाचा आहे. हा प्रकल्प चालविण्यासाठी दोन मेगावॅट वीज लागत आहे.

# ‘ससून’ला अहवाल फुटण्याचीच भीती अधिक!

## गर्भवती मृत्यू प्रकरणात रुग्णालय प्रशासनाने कर्मचाऱ्याकरवी थेट मुंबईला

**पुणे | प्रतिनिधी**

गर्भवती मृत्यू प्रकरणी ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या समितीने बुधवारी पोलिसांसह वैद्यकीय शिक्षण विभागाकडे आपला अहवाल पाठविला. गर्भवतीवर उपचार करताना डॉक्टरांकडून निष्काळजीपणा झाला का, याची चौकशी समितीने केली आहे. मात्र, हा अहवाल सादर करताना गोपनीयतेचा भंग होऊ नये, यासाठी हा अहवाल मुंबईत वैद्यकीय शिक्षण आयुक्तांकडे थेट कर्मचाऱ्याकरवी पाठविण्यात आला असून, अलंकार पोलीस ठाण्याला टपालाने पाठविण्यात आला आहे.



दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशांसाठी उपचारास नकार दिल्याने ईश्वरी (तनिषा) भिसे या गर्भवतीचा मृत्यू झाल्याचा दावा नातेवाईकांनी केला होता. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने या प्रकरणी समिती नेमून चौकशीचे आदेश दिले होते. राज्याचा आरोग्य विभाग, महापालिकेची माता मृत्यू अन्वेषण समिती आणि सहधर्मादाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समिती अशी तीन समित्यांकडून या प्रकरणी चौकशी करण्यात आली. या तिन्ही समित्यांनी यापूर्वीच चौकशी अहवाल राज्य सरकारला सादर केले आहेत.

ईश्वरी भिसे यांच्यावरील उपचारात निष्काळजीपणा झाल्याची तक्रार त्यांच्या नातेवाईकांनी अलंकार पोलीस ठाण्यात दिली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने ईश्वरी भिसे यांच्यावरील उपचारात निष्काळजीपणा झाला का, याची तपासणी ससून रुग्णालयाच्या समितीने केली. समितीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासह सूर्या हॉस्पिटल, मणिपाल हॉस्पिटल आणि इंदिरा आयव्हीएफ सेंटर या चारही रुग्णालयांमध्ये उपचार करताना निष्काळजीपणा झाला का, याची चौकशी ससूनच्या समितीने केली.

ससूनच्या प्रशासनाने बुधवारी अहवाल तयार केल्यानंतर सायंकाळी तो वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांच्याकडे कर्मचाऱ्याकरवी थेट मुंबईला पाठविला. ई-मेलवर अहवाल पाठविल्यास तो हॅक होऊन अहवाल फुटण्याची भीती रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केली. यामुळे अलंकार पोलीस ठाण्यालाही टपाल विभागाच्या माध्यमातून अहवाल पाठविण्यात आला. ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनीही याला दुजोरा दिला. मात्र, या निमित्ताने रुग्णालय प्रशासनाला अहवालापेक्षा फुटण्याची भीती अधिक असल्याचे समोर आले.

> “ससूनच्या समितीने चौकशी करून अहवाल अलंकार पोलीस ठाण्यात टपाल विभागाच्या माध्यमातून पाठविला आहे. वैद्यकीय शिक्षण आयुक्तांकडे मुंबईला हा अहवाल घेऊन रुग्णालयाचा कर्मचारी पाठविण्यात आला आहे.
>
> **- डॉ. यल्लपा जाधव, वैद्यकीय अधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय.**

# जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील 9 उड्डाणपुलांचा आराखडा प्रलंबित

## ‘एमएसआरडीसी’चा प्रस्ताव सात वर्षे केंद्राकडे पडून : महामार्गावरील कोंडी कायम

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नऊ उड्डाणपूल उभारण्याचा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा (एमएसआरडीसी) आराखडा सात वर्षांपासून प्रलंबित असल्याचे उघडकीस आले आहे. या प्रस्तावाला केंद्रीय भूपृष्ठ मंत्रालयाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने या महामार्गावरील कोंडी कायम आहे.

‘एमएसआरडीसी’ने या महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या समस्या सोडविण्यासाठी गर्दीची नऊ ठिकाणे निश्चित करून त्या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव २०१८ मध्ये केंद्र सरकारकडे पाठविला. द्रुतगती महामार्ग असला, तरी या महामार्गावर वाहनांची गर्दी



असल्याने कोंडी सोडविण्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने अहवाल तयार करण्यात आला. त्यामध्ये अपघातांची संख्या आणि वाहतूक कोंडी होणारे चौक, गावे यांचा आढावा घेण्यात आला.

खोपोली आणि लोणावळादरम्यान १६ किलोमीटर अंतरावर तीव्र वळण आणि चढ-उतार यामुळे वेग मंदावून अपघात होत असल्याने नऊ ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याची शिफारस या आराखड्यात करण्यात आली. त्यानंतर या बाबतचा प्रस्ताव केंद्रीय भूपृष्ठ मंत्रालयाकडे पाठविण्यात आला. मात्र, हा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे.

> “जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार नऊ उड्डाणपुलांचा आराखडा तयार करण्यात आला. याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय भूपृष्ठ मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. अद्याप या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली नाही.
>
> **- राहुल वसईकर, अधीक्षक अभियंता, एमएसआरडीसी.**

### उड्डाणपुलांची नऊ ठिकाणे

» सोमाटणे फाटा, लिंब फाटा, तळेगाव-चाकण रस्ता, एमआयडीसी वडगाव, देहूरोड वाय जंक्शन, वडगाव फाटा, निगडी फाटा ते कामशेत, कार्ला फाटा, कान्हे फाटा या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे आराखड्यात सुचविण्यात आले होते.

### आराखड्यातील ठळक बाबी

- प्रत्येक उड्डाणपूल सुमारे ३०० ते ५०० मीटर लांबीचे
- उड्डाणपुलासाठी २०८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित (सात वर्षांपूर्वी)
- सार्वजनिक, खासगी, भागीदारी (पीपीपी) तत्त्वानुसार उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन
- मुंबई-पुणे प्रवासाचा कालावधी ४५ मिनिटे कमी होण्याचा अंदाज

# म्हाडाच्या घरांची होणार टाउनशिप

## 22 मजली टॉवर उभारण्यासाठी नागरिक आले एकत्र, संत तुकारामनगर येथील म्हाडाच्या 900 घरांचे री-डेव्हलपमेंट


**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिक नगरीत आलेल्या कष्टकरी आणि गरिबांना हक्काचे छप्पर देण्यासाठी म्हाडाने गेल्या अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवडमध्ये घर बांधली. आता याच घरांपैकी संत तुकारामनगर येथील म्हाडाच्या ९०० घरांचे री-डेव्हलपमेंट करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. ९ एकर जागेत ही घरे असून, २० ते २२ मजली इमारती उभारण्याचा विचार सध्या केला जात आहे. म्हाडाने ही सगळी बैठी आणि दुमजली घरे दिली होती. ही घरे १ बीएचके आणि १ आरके असून, म्हाडाने जेव्हा ही घरे दिली तेव्हा ती २४० आणि १२० स्क्वेअर फुट होती. मात्र, कालांतराने येथील नागरिकांनी बांधकाम करून हीच घरे ५०० ते ६०० स्क्वेअर फुट करून घेतली आणि महापालिकेला त्याचा अतिरिक्त टॅक्स दिला जात आहे. ९०० लोकांनी प्रत्येकी ६०० रुपये भरून म्हाडाकडून शेअर सर्टिफिकेट घेतले आहे. या सर्वांचे एक गृहरचना संस्था रजिस्टर केली जाणार आहे.

म्हाडा अधिकारी आणि स्थानिक नगरसेवकांसह नागरिकांची या विषयाबाबत दोन ते तीन बैठका झाल्या आहेत. सुरुवातीच्या पहिल्या बैठकीसाठी म्हाडाचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हेदेखील उपस्थित होते. सर्वाधिक स्क्वेअर फुट आणि सर्व अम्युनिटीज देणाऱ्या बांधकाम व्यवसायिकालाच री-डेव्हलपमेंटचे अधिकार देण्याचा निर्णय येथील नागरिकांनी घेतला आहे. अनेकांची घरे अद्याप नावावर झालेले नाहीत. अनेकांनी यापूर्वी महापालिकेचा टॅक्स भरलेला नाही. त्यामुळे आता या नागरिकांची धावपळ सुरू झाली असून, एका वकिलाचीदेखील नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिकेच्या निवडणुकांमध्ये मोठी टाऊनशिप झाल्यावर प्रभाग रचना बदलली जाऊ शकते. एक गठ्ठा मतदान प्रतिस्पर्धी उमेदवाराला पडू शकते यामुळे आत्तापासूनच येथील काही स्थानिक राजकीय व्यक्ती यांनी या नियोजित प्रकल्पामध्ये अधिक रस घेतला आहे. राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप वाढल्याने मतमतांतरे सुरू झाली असून नागरिकांना आपल्या बाजूला खेचण्यासाठी चढावर सुरू झाली आहे. ९०० लोकांपैकी आत्तापर्यंत साडेपाचशे लोकांनी म्हाडामध्ये सहाशे रु पये भरून शेअर सर्टिफिकेट घेतले आहे. सर्वांनी एकत्र येऊन गृहरचना संस्था रजिस्टर करावी अशी सूचना म्हाडाने केली आहे. तर स्थानिक नेत्यांचे म्हणणे वेगळेच असून, यातून या प्रकल्पामध्ये कोणता बांधकाम व्यावसायिक पुढे करायचा यातून भविष्यात वाद होण्याची चिन्हे आहेत.

९०० लोकांनी एकत्र आल्यास ९ एकर जागेचा री-डेव्हलपमेंट प्रकल्प उभा राहिल्यास अधिकचा एफएसआय मिळू शकेल त्यामुळे नागरिक एकत्र होऊ लागले आहेत. तसेच नागरिकांनी एकत्र येऊन ही टाउनशिप उभारल्यास ती जिल्ह्यातील म्हाडाची री डेव्हलपमेंट होणारी पहिलीच गृहरचना संस्था ठरणार आहे.



### रस्त्यांची आखणी नव्याने होणार

» लघु उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गट अशा विभागणीत २१ ब्लॉक मध्ये ९०० घरे म्हाडाने ४० वर्षांपूर्वी बांधली आहेत. या घरांच्या आसपास महापालिकेने कालांतराने रस्ते, सांडपाणी, झाडे, फुटपाथ, पथदिवे उभारून दिले आहेत. तसेच या २१ ब्लॉक बाहेरून महानगरपालिकेचे टाऊन प्लॅनिंग नुसार रस्ते देखील आहेत. मोठी टाऊनशिप एकत्रित रित्या उभारल्यास अंतर्गत रस्ते आणि वल्लभनगर संत तुकाराम नगर भोसरी यांना जोडणाऱ्या रस्त्यांबाबत नव्याने आखणी करावी लागू शकते.

> “ नागरिक आमच्याकडे आले होते. त्यांच्या मागणीनुसार मी स्वतः अधिकाऱ्यांसह संत तुकारामनगर भागात जाऊन पाहणी केली. तसेच बैठक घेतली. नागरिकांना आवश्यक असणारी सगळी मदत म्हाडाच्या माध्यमातून केली जाणार आहे. नागरिक स्वतः हून पुढे येऊन हा प्रकल्प उभारत असल्याने ही स्वागतार्ह बाब आहे.
>
> - शिवाजीराव आढळराव पाटील, अध्यक्ष, पुणे म्हाडा

> “ खासगी गृहरचना संस्थांप्रमाणेच आम्हाला सगळ्या अमेनिटीज हव्या आहेत. काही लोकांनी अतिरिक्त वाढीव बांधकाम केले असले तरी त्याबाबतचा कर महापालिकेला भरला जातो. किती स्क्वेअर फुट घर मिळणार याबाबत आजी-माजी नगरसेवक भिन्न माहिती देत आहेत. ठराविक बिल्डर येथे आणण्यासाठी राजकीय लोकांची चढाओढ सुरू झाली आहे. मात्र, आम्हाला हव्या त्या सोयी आणि मोठी घरे देणाऱ्याला बिल्डरला आम्ही जागा देऊ, याबाबत आम्हा सर्वांचे एकमत झाले आहे.
>
> - संत तुकारामनगरमधील एक रहिवासी

# पवनेच्या प्रदूषणाला ड्रेनेज विभाग जबाबदार

## दुर्लक्षामुळे मिसळतेय रोज हजारो लिटर दूषित पाणी; पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

गंगानगर, आकुर्डी येथील नाल्यातून ड्रेनेज विभागाच्या दुर्लक्षामुळे हजारो लिटर दूषित पाणी पवना नदीत मिसळत आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. शहराच्या इतर भागात एसटीपी प्रकल्पातील दूषित पाणी नदीत मिसळत असल्याने ती प्रदूषित होते. मात्र याठिकाणी संबंधित प्रकल्पातील प्रक्रिया न केलेले नदीत सोडले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. ड्रेनेज विभागाच्या या अजब कारभारामुळे पवनेतील पाणी प्रदूषित होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेची अवस्था ही ' आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खातंय' अशी झाल्याची चर्चा आहे.

आकुर्डी येथे महापालिकेचा ३० एमएलडी क्षमतेचा एसटीपी प्रकल्प आहे. याठिकाणी दूषित सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पवनेते सोडण्यात आले आहे. त्या सांडपाण्याची चाचणी केली असता ते बहुतांश अशुद्ध असल्याचे समोर आले आहे. तर तेथूनच ड्रेनेज विभाच्या वाहिनीतून दूषित पाणी पवनेत मिसळत असल्याचे विदारक चित्र पाहावयास मिळत आहे. एसटीपीच्या क्षमतेपेक्षा ड्रेनेज वाहिनीतून दोन पट दूषित पाणी नदीला जाऊन मिसळत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या पाहणीतून समोर आले आहे. त्यामुळे एकीकडे आम्ही एसटीपीतून प्रक्रिया केलेले पाणी नदीत सोडत आहोत, असे म्हणत असताना त्याच महापालिकेतील ड्रेनेज विभागाच्या दुर्लक्षामुळे दररोज हजारो लिटर दूषित पाणी हे नदीत सोडल्याने प्रदूषणात भर पडत असल्याबद्दलचा संताप स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त करण्यात येत आहे.



### अशी झाली पवनामाईची दुरवस्था

» शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र २४ किलोमीटर आहे. किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. पवना नदी सातत्याने फेसाळत आहे. नदीतील पाण्यावर फेस तरंगतो. नदी प्रदूषित झाली आहे. मागच्या वर्षी पावसाळ्यात चारवेळा नदी फेसाळली. थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. मासे मृत पावले. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडल्याने सातत्याने नदी फेसाळत आहे. पवनामाईची दुरवस्था झाली आहे. नदीपत्रातील पाणी अशुद्ध झाले आहे. बंधाऱ्यातील पाणी दूषित झाल्याने मासे व इतर जलचर प्राणी मृत पावले आहेत. नदीपात्रातील पाणी अशुद्ध होत असल्याकारणाने शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. पवना नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.यासाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला जात आहे. अनेक पर्यावरणप्रेमी संघटना त्याविरोधात आवाज उठवत आहेत.परंतु, प्रशासन नदीचा प्रश्न गांभीर्याने घेत नाही.

# शेळगाव ग्रामपंचायतीने उभारला सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प

## पुणे जिल्ह्यातील पहिलाच अभिनव प्रकल्प, प्रक्रिया केलेले पाणी सिंचनासाठी उपयुक्त

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील शेळगाव ग्रामपंचायतीने सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत टायगर बायोटेक्नॉलॉजी प्रकल्प उभारला आहे. अशा प्रकारचा हा पुणे जिल्ह्यातील पहिला प्रकल्प असल्याची माहिती सरपंच ऊर्मिला लक्ष्मण शिंगाडे व ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप यांनी दिली. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर शेतीसिंचनासाठी केला जाणार आहे.



याबाबत जगताप यांनी सांगितले की, वैदवाडीतील नागरिकांचे आरोग्य गटराच्या पाण्यामुळे धोक्यात आले होते. या भागात दुर्गंधी तसेच अस्वच्छता निर्माण झाली होती. त्यावर उपाय म्हणून शेळगाव ग्रामपंचायतीने ओढ्यालगत बंदिस्त गटाराद्वारे पाणी आणण्याचा प्रकल्प हाती घेतला. परंतु, त्यास ओढ्यालगतच्या शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे वैदवाडी येथे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारून त्याचा पुनर्वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ग्रामपंचायत शेळगावअंतर्गत असलेल्या वैदवाडी येथील 1700 लोकसंख्येसाठी हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. सर्व कुटुंबांचे सांडपाणी बंदिस्त गटार लाइनमधून प्रकल्पाच्या ठिकाणी गोळा केले जाते. त्यावर टायगर बायोटेक्नॉलॉजी सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत प्रक्रिया करून ते पाणी पुन्हा शेतीसाठी वापरण्यात येते. प्रकल्पातून तयार होणारे वर्मी वॉश हे शेतीसाठी उपयुक्त आहे. ते शेळगावातील बागायतदार शेतकऱ्यांना अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीला 50 लाख रुपये खर्च आला आहे. प्रकल्प पूर्णत्वाकडे गेला आहे.

हा प्रकल्प करण्यासाठी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पाणी पुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आप्पासाहेब गुजर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयसिंह नलावडे, गटविकास अधिकारी सचिन खुडे यांचे सहकार्य लाभले असे शिंगाडे व जगताप यांनी सांगितले.

प्रकल्प चालू करण्यापूर्वी शेळगाव ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी यांनी सातारा जिल्ह्यातील हजार माची येथील प्रकल्पाला भेट दिली. प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे वैदवाडीतील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या प्रकल्पामुळे गाव निर्मल झाले आहे

### नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान

» टायगर बायोटेक्नॉलॉजी सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प म्हणजे टायगर बायोफिल्टर हे एक अभिनव तंत्रज्ञान आहे. जे गांडुळांच्या साहाय्याने सांडपाण्याचे नैसर्गिक आणि प्रभावी शुद्धीकरण करते. हे तंत्रज्ञान सांडपाण्यातील 99 टक्के रोगजंतूंना नष्ट करते.

> ग्रामपंचायत शेळगावने वैदवाडी येथे दैनंदिन 1 लाख 25 हजार लिटर क्षमतेचा टायगर बायोफिल्टर प्रकल्प उभारला आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी करण्यात आलेला पहिला प्रकल्प आहे. यातून प्रकिया केलेले पाणी शेतीसिंचनासाठी उपयुक्त ठरणार आहे. लवकरच शेळगाव गावठाणसाठी प्रकल्प उभारण्यात येणार आहे.
>
> -- चंद्रकांत जगताप, ग्रामपंचायत अधिकारी, शेळगाव

> शेळगाव-वैदवाडी येथील बंदिस्त गटर पाइपलाइन शेतकऱ्यांनी अडवली होती. त्यावर ग्रामपंचायतीने अतिशय सुंदर असा मार्ग काढत जिल्ह्यातील पहिला सांडपाणी प्रकल्प उभारला.
>
> -- - सचिन खुडे, गटविकास अधिकारी, इंदापूर

# आंबेगाव तालुक्यात केळी, आंबा, स्ट्रॉबेरी पिकांचे क्लस्टर करणार : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

## पुणे जिल्ह्यात केळी, अंजीर, आंबा, स्ट्रॉबेरी आणि तेल बियावर्गीय सूर्यफूल व करडई या पिकांच्या निर्यातक्षम उत्पादनासाठी क्लस्टर बेस नियोजन करण्यात येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात केळी, अंजीर, आंबा, स्ट्रॉबेरी आणि तेल बियावर्गीय सूर्यफूल व करडई या पिकांच्या निर्यातक्षम उत्पादनासाठी क्लस्टर बेस नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये उत्पादन वाढीसह प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि निर्यातीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वंकष आराखडा तयार करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या आहेत.



या सर्व सुविधांसाठी विविध योजनांचे एकत्रीकरण करून तसेच जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन देखील त्यांनी दिले. आंबेगाव तालुक्यातील केळी, आंबा व स्ट्रॉबेरी पिकाचा समावेश करण्यात आला आहे. “केळी पिकाचे जिल्ह्यात १ हजार ६०० हेक्टर क्षेत्र असून ते आगामी वर्षात ३ हजार हेक्टरपर्यंत नेण्याचे, तसेच प्रति हेक्टरी उत्पादनातही वाढ होण्याच्या दृष्टीने लक्ष्य ठेवावे.

त्यासाठी केळी लागवडीसाठी इच्छुक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे, त्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे, दर्जेदार रोपे पुरविणे, पाण्याची व्यवस्था, मातीचे आरोग्य, जैविक आधारित खते, औषधे आदी निविष्ठा, कृषी यांत्रिकीकरण तसेच पीकनिहाय उत्कृष्ट उत्पादन पद्धती, लागवडीपूर्वीची, पिकाच्या काढणीपूर्वीची आणि काढणीपश्चात प्रक्रिया आदींबाबतच्या तंत्र, योजनांची माहिती व प्रत्यक्ष शेतकऱ्यांना त्याबाबतचा लाभ कसा मिळेल आदींचा समावेश प्रशिक्षण सत्रामध्ये करण्यात यावा,” अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

उत्पादन वाढीसह प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि निर्यातीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने सर्व घटकांना सोबत घेऊन सर्वंकष आराखडा तयार करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या आहेत.

याच पद्धतीने स्ट्रॉबेरी, अंजीर, आंबा आदींवरही लक्ष केंद्रित करण्यात यावे. प्रशिक्षणाची व्यवस्था आत्मा आणि कृषी विज्ञान केंद्रांनी समन्वयाने करावी. शेतकऱ्यांचे या पिकांच्या अनुषंगाने पीकनिहाय दोन दिवसीय प्रशिक्षण कृषी विज्ञान केंद्रांच्या ठिकाणी २३ एप्रिलपासून आयोजित करण्यात येणार आहे. तरी आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी सदर क्लस्टरमध्ये सहभागी होण्यासाठी गावातील कृषी सहाय्यक किंवा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय व तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मंडळ कृषी अधिकारी सोपान लांडे यांनी केले आहे.

### निर्यातीसाठी गुणवत्तेवर भर द्यावा...

» परदेशी बाजारपेठेत निर्यातीसाठी तेथील मागणी, कृषिमालाची दर्जा, गुणवत्ता यावर विशेष भर द्यायचा असून, त्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना निर्यात सुविधा केंद्रांसाठी आवश्यक शीतकरण, निर्यातीसाठी प्रक्रिया केलेला कृषिमाल वाहतूक आदींच्या सुविधा निर्मितीसाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प तथा स्मार्ट, केंद्र शासनाचा कृषी पायाभूत सुविधा निधी, अशा विविध योजनांतून लाभ देण्यात येईल.